भा.कृ.सं.प.-रा.डा.संशो.कें. ई-प्रकाशन-२०१८/४

# डाळींब: शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्न मिळविण्यासाठी एक पीक - शेतकऱ्यांच्या यशोगाथा


## भारतीय कृषी संशोधन परिषद

## राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र

रा.महा.-६५, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर, महाराष्ट्र-४१३ २५५

**द्वारा प्रकाशित:**
**संचालक**
भा.कृ.सं.प.-राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र
पोस्ट ऑफिस, केगांव, सोलापूर (महाराष्ट्र) ४१३ २५५.

**संपादक : ज्योत्सना शर्मा, डी.टी. मेश्राम, निलेश गायकवाड, दिनेश बाबू, डी.टी. चौधरी आणि एस.एस. वडणे**

**तांत्रिक सहाय्यता: युवराज शिंदे आणि महादेव गोगाव**

**ई-प्रकाशन वर्ष: २०१८**

**उद्धरण : ज्योत्सना शर्मा, डी. टी. मेश्राम, निलेश गायकवाड, दिनेश बाबू, डी.टी चौधरी आणि एस.एस. वडणे (२०१८). डाळींब: शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्न मिळविण्यासाठी एक पीक - शेतकऱ्यांच्या यशोगाथा. भा.कृ.सं.प.- राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र; ई-प्रकाशन- २०१८/४**

**खंण्डण:**
सर्व अधिकार आरक्षित आहेत. या पुस्तकचा कोणताही भाग प्रकाशकाच्या परवानगी शिवाय कोणत्याही माध्यमातुन प्रकाशीत करणे गुन्हा आहे.

संकेतस्थळ:**http//www.nrcpomegranate.icar.gov.in**

# प्रस्तावना

डाळींब (*पुणिका ग्रॅनॅटम एल.*) भारतातील कोरड्या दख्खनच्या पठारातील सर्वात लोकप्रिय पिकांपैकी एक मानले जाते. उत्तम उत्पादकता व बाजारभाव यामुळे डाळिंब शेती फायदेशीर ठरली आहे आणि म्हणूनच भारतात त्याची लागवड मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

विविध हवामानत उत्पादन क्षमता, कमी पाण्याची आवश्यकता, उच्च तंत्रज्ञानाचा वापर, कोरडवाहू क्षेत्रातील शेतीमध्ये गुंतवणुकीवर सर्वात चांगला परतावा, औषधी गुणधर्म, खाण्यासाठी व प्रक्रिया उत्पादनासाठीची प्रचंड मागणी आणि उत्तम निर्यात क्षमतेमुळे अलीकडच्या काळात उष्ण कटिबंधीय व उपोष्ण कटिबंधीय प्रदेशांतील एक लोकप्रिय फळ बनले आहे.

भारत डाळिंब उत्पादनात आणि क्षेत्रफळामध्ये जागतिक पातळीवर आघाडीवर आहे. २०१८-१९ च्या NHB च्या तिसऱ्या आगाऊ अंदाजानुसार भारतामध्ये डाळिंब पिकाखाली २.३४ लाख हेक्टर क्षेत्रफळ आहे व २८४५ हजार मेट्रिक टन उत्पादन झाले आहे. भारतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आणि आंध्रप्रदेश या राज्यामध्ये डाळिंबाची मोठ्या प्रमाणावर लागवड झाली आहे तसेच हिमाचल प्रदेश, राजस्थान, तेलंगना, छत्तीसगढ आणि मध्यप्रदेश या राज्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे; तसेच तमिळनाडु, मिझोरम, उडीसा, नागालँड, लक्षद्वीप, झारखंड आणि जम्मू-काश्मीर मध्ये सुद्धा काही क्षेत्र लागवडीखाली येत आहेत.

ह्या वाढत्या उत्पादन आणि उत्पादकतेचे श्रेय या देशातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना जाते जे डाळिंब संशोधक, तंत्रज्ञ, धोरणकर्ते आणि प्रशासकांबरोबर अथकपणे काम करत आहेत. डाळींब शेतीमध्ये कठोर परिश्रम करणाऱ्या वैज्ञानिक दृष्टिकोण आणि नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून डाळिंब उत्पादनामध्ये उच्चांक गाठणाऱ्या शेतकरी बांधवांच्या प्रयत्नांना डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांपुढे आणण्यासाठी व त्यांच्या कार्यास प्रसिद्धि मिळवून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राने **चौदावा स्थापना दिवशी डाळिंब शेतकऱ्यांच्या यशोगाथा ई-प्रकाशनाच्या माध्यमातुन डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांपुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे.**

ज्योत्सना शर्मा

**ज्योत्सना शर्मा**
**संचालक (प्रभारी)**

## अनुक्रमणिका



| अ. क्र. | शीर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | निर्यातक्षम डाळिंब उत्पादन | ५ |
| २ | डाळिंबाची रोप वाटिका आणि डाळिंबाच्या बागेमध्ये आंतर पीक पध्दतीचे यश | ६ |
| ३ | भा.कृ.अनु.प.-रा.डा.संशो.कें., सोलापूर यांच्या मार्गदर्शनामुळे डाळींबाची बाग यशस्वी झाली | ७ |
| ४ | शाश्वत डाळिंब उत्पादनासाठी सेंद्रीय शेती | ८ |
| ५ | डाळींब उत्पादनासाठी पाणी आणि सेंद्रिय खताचे व्यवस्थापन | ९ |
| ६ | डाळींबाच्या दर्जेदार उत्पादनासाठी सेंद्रिय शेती | १० |
| ७ | निरोगी आणि रोग मुक्त फळबागेसाठी एकात्मिक रोग व किड व्यवस्थापन पद्धत | ११ |
| ८ | निरोगी आणि रोग मुक्त फळबागासाठी अन्नद्रव्य व्यवस्थापन पद्धत | १२ |
| ९ | उत्कृष्ट डाळींब उत्पादनासाठी सेंद्रिय शेती | १३ |
| १० | क्षारयुक्त पाण्याच्या समस्येवर मात करुन निर्यात योग्य डाळिंब उत्पादन | १४ |

## निर्यातक्षम डाळिंब उत्पादन

### वैयक्तिक माहिती



| | |
|---|---|
| **नाव** | श्री. रविंद्र धनसिंग पवार |
| **वय** | ५५ वर्ष |
| **शिक्षण** | ५ वी |
| **पत्ता** | |
| मु. सातमाने, पो. रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक (४२३ १०८) | |
| **संपर्क** | ९८२३०६८६६६ |

### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | ७० एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | ४५ एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | २५ एकर द्राक्षबाग |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | ८०-९० हजार |

| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती** |
|---|---|
| • उस तोडणी कामगार म्हणून मजूरी करत होतो आणि वडिलाची जमीन २.५ एकर होती.<br>• वार्षिक उत्पन्न ७०,००० ते ८०,००० रुपये एवढे होते. | • डाळींबामुळे माझ्याकडे ७० एकर जमीन आहे तसेच कार आणि ३ ट्रॅक्टर सुद्धा आहेत.<br>• डाळींबापासून एकूण वार्षिक उत्पन्न ३ कोटी रुपये एवढे आहे आणि ७० एकर जमीन आहे |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- १९८५ साली ३० गुंटे जमिनीमधे खड्डे खोदून १४ x १४ फुट अंतरावर डाळिंब लागवड केली.
- सेंद्रिय खतांचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात (४० किलो प्रति झाड) वापर करतो त्यामुळे झाडांची वाढ व उत्पादन क्षमता वाढते.
- फळाचा आकार आणि रंग चांगला यावा म्हणून मी संपूर्ण झाडावर आच्छादन करतो आहे म्हणूनच मी गेल्या ५ वर्षापासून डाळिंब युरोपमध्ये निर्यात करतो आहे.
- श्री. संपत विष्णु मोरे यानी डाळींब लावण्यास मार्गदर्शन केले व आज मी त्याना माझे आदर्श (गुरु) मानतो.





## डाळिंबाची रोपवाटिका आणि डाळिंबाच्या बागेमध्ये आंतरपीक पध्दतीचे यश

### वैयक्तिक माहिती



| | |
|---|---|
| **नाव** | श्री. सुभाष किसनराव टेकाडे पाटील |
| **वय** | ६६ वर्ष |
| **शिक्षण** | १० वी पास |
| **पत्ता** | रा. पिंपळगाव (डोळा), पो. भारसीरपुरा, ता. कळंब, जि. उस्मानाबाद (४१३ ५०७) |
| **संपर्क** | ९७६३४७४८६८ |

### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | १८ एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | ५ एकर आणि १४०० रोपे ही रोपवाटिकेसाठी |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | १३ एकर |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | ७०-८० हजार रुपये |

| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती** |
|---|---|
| • १९८६-२००० पर्यंत मी ट्रक ड्रायव्हर होतो आणि ५ एकर वडिलो पार्जित जमीन होती.<br>• मी ज्वारी, सोयाबीन, इत्यादि पीके घेत होतो. माझे वार्षिक उत्पन्न ६०,००० ते ७०,००० रुपये एवढे होते. | • वर्ष २००० साली श्री. रमेश खर्चे मुळे मी डाळिंबाकडे वळलो. वडिलो पार्जित जमीनीवर डाळींब लागवड केली आणि त्याच्यामध्ये यश मिळाले.<br>• सुरवातील ५ एकर डाळिंब बागेपासून १५-१६ लाख एवढा नफा होत होता तर आता मला ३०-३५ लाख रुपये एवढा नफा मिळत आहे. |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- २००१ साली नवीन डाळिंब बागेची लागवड केली. १८ वर्षापासून तेल्या रोगाचा अजिबात प्रादुर्भाव झाला नाही.
- ट्रॅक्टर चलित यंत्रे, पावर टिलर, इत्यादि यंत्रापासून बागेची निगा राखतो.
- गांडूळ खत व शेणखत ५ किलो प्रति झाड दिल्यामुळे भरघोस उत्पादन मिळाले आहे.
- २००१ साली श्री रमेश खर्चे यांच्या मार्गदर्शनाने डाळींब लागवड केली.
- डाळींबामध्ये कलिंगड, कोबी, गहू इत्यादि आंतरपिके घेतो.





## भा.कृ.अनु.प.-रा.डा.संशो.कें., सोलापूर यांच्या मार्गदर्शनामुळे डाळींबाची बाग यशस्वी झाली

### वैयक्तिक माहिती



| | |
|---|---|
| **नाव** | श्री. दादासाहेब बजरंग अहिर |
| **वय** | ५४ वर्ष |
| **शिक्षण** | ७ वी पास |
| **पत्ता:** मु.पो. निर्मळ पिंपरी, ता. राहता, जि. अहमदनगर | |
| **संपर्क** | ९७३०३८०७३० |

### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | ७ एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | २ एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | ५ एकर |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | २०,०००- २५,००० रुपये |

| डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती | डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती |
|---|---|
| • वडिलोपार्जित जमीन २ एकर होती व मी शेतीच करत होतो. डाळींब लागवडी पूर्वी तुर, ज्वारी, इ. पीके घेत होतो.<br>• माझे वार्षिक उत्पन्न ७०,००० ते ७५,००० रुपये एवढे होते. | • आता माझ्याकडे ५० लाखाचे घर, १० लाख रुपये ची कार व २ एकर जमीन आहे.<br>• डाळींबा पासून एकूण वार्षिक उत्पन्न ४०-४५ लाख रुपये एवढे आहे. |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- मी २००१ साली नवीन १ एकर डाळिंब बागेची लागवड केली आणि यासाठी कोणत्याही प्रकरचा रोग नसलेली रोपांची निवड केली. एकरी १२ x १३ फुट या अंतरावर रोपांची लागवड केली होती.
- सेंद्रिय खतांचा वापर ३०-३५ किलो प्रति झाड या प्रमाणात दिल्यामुळे भरघोस उत्पन्न मिळत आहे.
- दुष्काळ परिस्थितीत १२ वर्षे टँकर ने पाणी देऊन मी डाळिंब बाग जगवली व उत्पादन घेतले.





## शाश्वत डाळिंब उत्पादनासाठी सेंद्रीय शेती

### वैयक्तिक माहिती



| | |
|---|---|
| **नाव** | श्री. पुरुषोत्तम अनुरथ चव्हाण |
| **वय** | ३४ वर्ष |
| **शिक्षण** | १० वी |
| **पत्ता** | |
| मु.पो. चोरआंबा, ता. धारुर (किल्ले), जि. बीड | |
| **संपर्क** | ९०९६९६१७५५ |

### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | १०.५ एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | ५ एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | ५.५ एकर |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | २०,०००-२५,००० रुपये |

| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती** |
|---|---|
| • उस तोडण्याचे मजूर म्हणून काम करत होतो आणि वडिलो पार्जित जमीन १.५ एकर होती.<br>• डाळींब लागवडी पूर्वी तुर, ज्वारी, ई. पीके घेत होतो.<br>• माझे वार्षिक उत्पन्न ४०,००० ते ५०,००० रुपये एवढे होते. | • श्री. सुभाष (टेकाडे) पाटील यांच्या कडून डाळिंब लागवडी साठी प्रेरणा मिळाली.<br>• डाळिंब उत्पादनापासुन ६ बोअर, २ विहिर आणि ९ एकर जमीन विकत घेतली आहे.<br>• तसेच मोटर साइकल, ट्रॅक्टर व ट्रॅक्टर चलित आवजारे, एच.टी.पी. ई. घेतले आहे.<br>• ५ एकर डाळींबा पासून प्रति वर्ष ३०-४० लाख रुपये मिळत आहेत.<br>• १४०० झाडांच्या रोप वाटिकेपासून ८-१० लाख रुपये इतका नफा मिळाला आहे. |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- कोणत्याही प्रकारचा रोग नसलेल्या रोपांची लागवडीसाठी निवड केली व नंतर काही रोपे स्वतः बनवलेल्या रोप वाटिकेतील लावली.
- सेंद्रिय खतांचा वापर जास्त प्रमाणात केल्यामुळे भरघोस उत्पन्न मिळत आहे.
- पाण्याच्या कमतरतेमुळे ठिबक सिंचन करून पाण्याचे योग्य नियोजन केले आहे.





| डाळींब उत्पादनासाठी पाणी आणि सेंद्रिय खताचे व्यवस्थापन | |
|---|---|
| वैयक्तिक माहिती | |
| **नाव** | श्री. दत्तात्रय भगवान कोळवले |
| **वय** | ३२ वर्ष |
| **शिक्षण** | १२ वी |
| **पत्ता** | |
| मु.पो. आजनाळे, ता. सांगोला, जि. सोलापूर (४१३ ३०८) | |
| **संपर्क** | ९०९६७२३५०३ |



| शेतीचा तपशील | |
|---|---|
| **एकूण लागवडी खालील क्षेत्र** | १६ एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | १४ एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | ३ एकर |
| **लागवडीचा खर्च/एकर/वर्ष** | १.५० लाख रुपये |
| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती** |
| • एच.टी.पी.चे (HTP) आणि दुचाकी दुरुस्तीची कामे करत होतो आणि केवळ २ एकर वडिलोपार्जित जमीन होती.<br>• डाळींब लागवडी पूर्वी तुर, ज्वारी, इ. पीके घेत होतो. माझे वार्षिक उत्पन्न ६५,००० ते ७०,००० रुपये एवढे होते. | • माझ्याकडे आता डाळींबामुळे १३ एकर जमीन खरेदी केली आहे तसेच चार चाकी गाड़ी सुद्धा घेतली आहे. डाळींबा पासून एकूण उत्पन्न ३५-४० लाख रुपये एवढे आहे. |

**तंत्रज्ञानाचे वर्णन**

- वर्ष १९९५ ला ३०० गणेश जातीच्या वाणाची लागवड केली होती.
- एकरी १३ x ९ फुट या अंतरावर रोपांची लागवड केली व १.५ कोटी लिटर क्षमता असलेले २ शेततळे तयार केले.
- मी कायम स्वरूपी हस्त बहार घेतो आणि सेंद्रिय खतांचा वापर जास्त प्रमाणात करतो.
- श्री. राजु पाटील यांच्या कडून मला डाळिंब लागवडीसाठी प्रेरणा मिळाली.





## डाळींबाच्या दर्जेदार उत्पादनासाठी सेंद्रिय शेती

### वैयक्तिक माहिती



| | |
|---|---|
| **नाव** | श्री. लालासो बापूराव सूर्यवंशी |
| **वय** | ५५ वर्ष |
| **शिक्षण** | १०वी |
| **पत्ता** | |
| मु.पो. खांदोडवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली (४१६ २०९) | |
| संपर्क | ९०७५४३१८४० |

### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | ३३ एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | १० एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | १० एकर |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | १.५० लाख रुपये प्रति एकर |

| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती** |
|---|---|
| • वडिलोपार्जित जमीन १.५ एकर होती व मी शेतीच करत होतो.<br>• डाळींब लागवडी पूर्वी कापूस हे पीक घेत होतो. माझे वार्षिक उत्पन्न ५०,००० ते ५५,००० हजार रुपये एवढे होते. | • आता डाळींबामुळे माझ्याकडे ३३ एकर जमीन आहे.<br>• डाळींबा पासून मागील वर्षी एकूण उत्पन्न ८०-८५ लाख रुपये मिळाले आहे. |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- सुरवातीला १९९४-२००० सालापर्यंत गणेश जातीचे डाळींब लागवडी खाली होते नंतर २००० साली मी भगवा जाती च्या रोपांची १२ x १२ फुट या अंतरावर लागवड केली होती.
- ८ लाख रुपये खर्च करून १७८ x ३०० व खोली १५० फुट अशा आकाराचे २.५ कोटी लिटर क्षमता असलेले शेततळे बनवले आहे.
- मी सेंद्रीय खते जास्त प्रमाणात वापरतो जसे की एका झाड़ाला ४० किलो शेणखत, १० किलो निंबोळी पेंड, ५ किलो उसाची मळी आणि ऊसाचे पाचट ४-५ किलो वापरतो.





| निरोगी आणि रोग मुक्त फळबागासाठी एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन पद्धत | |
|---|---|
| **वैयक्तिक माहिती** |  |
| **नाव** | श्री. कृष्णा यामानाप्पा सालापर |
| **वय** | ४० वर्ष |
| **शिक्षण** | बी. ए. बी. एड. |
| **पत्ता** | |
| मु.चीक्का समासी, पो. कलादागीहोबली, ता. बागलकोट, जि. बागलकोट | |
| संपर्क | ८१०५५५९१३२, ७८९२००३४७४ |
| **शेतीचा तपशील** | |
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | ३० एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | ९ एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | २१ एकर |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | रु. १.७५ लाख आणि सध्या रु. १.१२ लाख प्रति एकर तसेच २०१२ सालापासून हळू हळू कमी होत आहे. |
| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परि स्थिती** |
| • वडिलोपार्जित जमीन १.५ एकर होती व मी शेतीच करत होतो. डाळींब लागवडी पूर्वी उस हे पीक घेत होतो. त्यामधून ७५ हजार रुपये उत्पन्न मिळत होते. | • डाळिंब लागवडी नंतर ३ वर्षां पासून ३ लाख प्रति एकर आणि जास्तीत जास्त रु. ६ लाख कमाई केली गेली. आता ४०-४५ लाख रुपये मिळत आहेत.<br>• एफपीओ चा सचिव बनलो आणि विविध शेतकरी मेळ्याव्या मध्ये प्रगतशील शेतकरी म्हणून आमंत्रित केले जाते. |

**तंत्रज्ञानाचे वर्णन**

- भा.कृ.अनु.प.-रा.डा.संशो.कें., सोलापूरची आय. डी. आय. पी. एम. शेड्यूल आणि यू. एच. एस., बागलकोटची शिफारशी अवलंबली.
- खतांचा कमी वापर आणि खतांच्या सुधारित कार्यक्षमतेसाठी बायो-इनोकुलंट्सचा वापर केला.
- सिंथेटिक रसायनांचा आणि एन्टीबायोटिक्सचा कमी वापर करण्यासाठी जैव-कीटकनाशकांचा वापर केला.
- कीड आणि रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि स्वच्छ बाग ठेवण्यासाठी सुधारित पद्धतीचा वापर केला.
- खाजगी सल्लागारांच्या मदतीशिवाय डाळिंब उत्पादनासाठी फक्त शिफारस केलेले रसायने आणि खताचा वापर केला.





## निरोगी आणि रोग मुक्त फळ बागेसाठी अन्नद्रव्य व्यवस्थापन पद्धत

### वैयक्तिक माहिती



| | |
|---|---|
| **नाव** | श्री. भागवत उत्तम पवार |
| **वय** | ५४ वर्ष |
| **शिक्षण** | १२ वी |
| **पत्ता** | मु.पो. तामशीद्वाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर (४१३१०१) |
| **संपर्क** | ९८२२९४४९४९ |


### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | ७० एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | १२ एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | ५८ एकर |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | १.५० लाख रुपये |

| डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती | डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती |
|---|---|
| • वडिलोपार्जित जमीन १.५ एकर होती व मी परिवहन आणि निर्यात (हुंडेकरी) म्हणून काम करत होतो.<br>• डाळिंब लागवडी पूर्वी तुर, ज्वारी, ई. पीके घेत होतो.माझे वार्षिक उत्पन्न ९०,००० ते ९५,००० रुपये एवढे होते. | • त्यानंतर आम्हाला गेल्या ३ ते ४ वर्षांपासून १२३० झाडांमधून सुमारे ९०-९५ लाख रुपये उत्पन्न मिळाले आणि डाळींबा मुळे मी भरपूर प्रगती केली आहे.<br>• डाळिंब उत्पादनातून मी निंबोळी पेंड ची फ़ैक्टरी सुद्धा चालू केली आहे. |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- सुरवातीला १९८९ साली गणेश जातीचे डाळींब लागवडी खाली होते नंतर १९९९ मधे मी भगवा जातीच्या डाळींबाची लागवड केली तेव्हा पासून माझ्या जीवनाला कलाटनी मिळाली. एकरी १५ x १० फुट या अंतरावर रोपांची लागवड केली आहे.
- २६ लाख रुपये खर्च करून २ एकर क्षेत्रावर २.७५ कोटी लिटर क्षमता असलेले शेततळे केले आहे व त्यातील ११ एकर शेताला सायपन पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात विजेची बचत होते.
- तेल्या रोगाच्या नियंत्रणसाठी बहार बदलला आणि स्फुरद व पालाश चे जामिनी मधील प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न केला व सर्वात महत्वाचे म्हणजे बागेला पाणी कमी प्रमाणात दिले.
- कालीसेना व जोश याचा वापर वर्ष भरातून दोन वेळा करतो त्यामुळे मर रोग नियंत्रणात आलेला दिसून आला आहे. तसेच पांढरी मुळे वाढण्यास मदत होते.
- मी कायम स्वरूपी हस्त बहार घेतो व फक्त यूरोप लाच डाळिंब निर्यात करतो त्यामुळे मला पैसे मिळतात.






## उत्कृष्ट डाळींब उत्पादनासाठी सेंद्रिय शेती

### वैयक्तिक माहिती



| | |
|---|---|
| **नाव** | श्री. राजेन्द्र सीताराम येवले |
| **वय** | २६ वर्ष |
| **शिक्षण** | एम.एस.सी.कृषी (किटकशास्त्र) |
| **पत्ता** | मु.पो. मल्हारवाडी, ता. राहुरी, जि. अहमदनगर(४१३ ७०५) |
| **संपर्क** | ७९७२३०९५१४; ९४०३६०४५८९ |

### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | ७० एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्रफळ** | ४० एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | ३० एकर |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | १.६० लाख रुपये |

| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती** |
|---|---|
| • वडिलो पार्जित जमीन ५ एकर होती.<br>• डाळींब लागवडी पूर्वी कांदा, टरबूज ई. पीके घेत होतो तसेच माझे वार्षिक उत्पन्न ४०,०००० ते ५०,०००० रुपये एवढे होते. | • आता डाळींबा मुळे ७० एकर जमीन आहे तसेच ५० लाख रुपये चे घर व कार तसेच ३ ट्रॅक्टर व सर्व ट्रॅक्टर चलित आवजारे आहेत.<br>• डाळींबापासून एकूण उत्पन्न ३ कोटी रुपये मिळत आहे. |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- सेंद्रीय खतांच्या वापर केल्यामुळे व किटकनाशकाचे योग्य नियोजन केल्यामुळे फळ काढण्याच्या वेळेला किटकनाशकांचे अवशेष आढळत नाहीत.
- मुळा प्रकल्पातून पाईप लाईन द्वारे पाणी आणून ते १.८० कोटी लिटर असलेल्या शेततळ्यात साठवून त्याचे योग्य प्रकारे ठिबक सिंचनाद्वारे डाळिंब पिकासाठी वापर केला आहे.
- नवीन डाळींब लागवड करताना नर्सरी मधून रोग रहित रोपांची निवड केली.
- ट्रॅक्टर चलित फवारणी, धुरळणी, स्लरी व आंतरमशागतीची कामे आधुनिकरित्या केली जातात.
- फुल धारणा झाल्यानंतर परागीभवानासाठी मधमाश्यांच्या पेट्यांचा वापर केला जातो.
- सेंद्रीय खताचा वापर दोन वर्षां पर्यंत १५ टन प्रति एकर व तिसऱ्या वर्षी २२ टन प्रति एकर केला.






## क्षारयुक्त पाण्याच्या समस्येवर मात करुन निर्यात योग्य डाळिंब उत्पादन

| | | |
|---|---|---|
| **नाव** | श्री. राहुल अमृता रसाळ |  |
| **वय** | २७ वर्ष | |
| **शिक्षण** | कृषी पदविका | |
| **पत्ता** | मु. पो. निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर (४१३ ३०६) | |
| **संपर्क** | ९७६६५५०३२४ | |

### शेतीचा तपशील

| | |
|---|---|
| **एकूण लागवड़ी खालील क्षेत्र** | ६० एकर |
| **डाळिंब अंतर्गत एकूण क्षेत्र** | १३ एकर |
| **इतर पिका अंतर्गत क्षेत्र** | ४७ लाख |
| **लागवड़ीचा खर्च/एकर/वर्ष** | १.५ लाख रुपये प्रति एकर |

| **डाळिंब लागवडीपूर्वीची परीस्थिती** | **डाळिंब लागवडी नंतरची परीस्थिती** |
|---|---|
| • वडिलोपार्जित जमीन २० एकर होती.<br>• डाळींब लागवडी पूर्वी कांदा, टरबूज, इ. पीके घेत होतो. त्यातून फक्त २ ते २.५ लाख रुपये उत्पन्न मिळत होते. | • डाळिंब उत्पादनातून ६० एकर जमीन आहे, माझ्याकडे ४० लाख रु. चे घर, ट्रॅक्टर आणि सर्व शेतीचे यांत्रिकीकरण केले आहे.<br>• केवळ डाळींबापासून दरवर्षी ४८-५० लाख उत्पन्न मिळत आहे. |

### तंत्रज्ञानाचे वर्णन

- वडिलांनी १९९० साली १ एकर आरक्ता व १ एकर गणेश जातीची डाळिंब लागवड केली त्यानंतर १९९९ साली ३ एकर भगवा जातीची लगवड केली.
- रिवर्स ऑस्मोसीस तंत्रज्ञानाचा वापर करून २००० टी.डी.एस. व सामु ९ असणारे पाणी ५० टी.डी.एस. व ६.९ सामु मधे १००० लीटर प्रति तास क्षमतेच्या आर. ओ. यूनिट द्वारे परिवर्तित केले. याद्वारे फवारणी वरील खर्च ३० टक्क्यांनी कमी करता आला व त्या पाण्यापासून केलेली फवारणी ही जास्त परिणाम कारक आहे.
- मी माझ्या शेतामधे स्वतःचे वेदर स्टेशन बसवले आहे त्यामुळे हवामानाचा अचुक अंदाज हा मला वेळेत मिळतो त्यामुळे रोग व किडींचा होणारा प्रादुर्भाव हा मला वेळेत समजत असल्यामुळे फवारणीत मला बदल करता येतो व खर्च वाचविता येतो.
- पूर्वी माझ्या जमिनीचा सेंद्रिय कर्ब हा ०.४० टक्के होता तर तो आता १.४० टक्के आहे त्याचे कारण, बायोगैस च्या स्लरी मध्ये ५ मिली ग्राम ऑक्सिजन ही स्लरी फर्मेंटर च्या मदतीने मिसळवून शेती साठी वापरली.
- त्यानंतर भगवा जातीचे डाळिंब निर्यात करायला लागल्या नंतर माझ्या जीवनात कलाटणी मिळाली.
- डाळिंबाच्या उत्पन्नापासून २०१० ला शेजारच्या गावांमध्ये ४० एकर क्षेत्र घेऊन त्यामध्ये १ कोटी लिटर पाणी क्षमता असलेले शेत तळे तयार करून तिथे १० एकर डाळिंब लागवड केली.



